## रेग्यु. दिवाणी मुकदमा नं. ४०/२०१३ मधील नि. ११४ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र. १२ हिचे वारस दाव्याचे कामी दाखल करण्याकरीता केलेला आहे.

२. वादीच्या मते तिला तीन वारस आहेत. वादीला प्रतिवादी क्र. १२ चे मृत्यू दाखला वेळेत प्राप्त न झाल्यामुळे तिचे वारस रकॉर्डवर आणणे शक्य झाले नव्हते. प्रस्तुतचा दावा हक्क स्थपनेसाठी व वाटपासाठी असल्यामुळे प्रतिवादी क्र. १२ चे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे.

३. प्रतिवादी क्र. २ ते ९ यांनी अर्जावरच म्हणणे दाखल करुन अर्जाचे खंडण केले असुन अर्जातील कारण योग्य व संयुक्तीक नाही असे दिले आहे. वादीने वेळेमध्ये अर्ज दाखल न केल्यामुळे सदरचा अर्ज पात्र नाही असे त्याचे म्हणणे आहे.

४. एकंदरीत परिस्थितीचा विचार करता असे दिसते की प्रस्तुतचा दावा हा हक्क स्थापणेसाठी व वाटपासाठी आहे. त्याकरीता प्रतिवादीचे वारसांची उपिस्थती ही अत्यंत आवश्यक आहे. अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १२ हिचे वारस अर्जातील नमुद व्यक्ती नाही अशी हरकत प्रतिवादीने घेतलेली नाही. सबब त्या व्यक्तीस प्रतिवादी क्र. १२ यांचे वारस म्हणुन या कामात दाखल करण्यास काही हरकत नाही. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यता येत आहे.

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. दुरुस्त प्रत देण्यात यावी व दुरुस्ती प्रत दिल्यानंतर समन्स काढण्यात यावे.

सही/—

दिनांक— १३/०७/२०१७ (वि. द. पाटील)

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.